**महाराष्ट्र शासन**

**समाज कल्याण आयुक्तालय,3 चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-411 001**

दूरध्वनी क्र .20-26122752 फॅक्सक्र.020-26126698 ईमेल sakalyanpuneest@gmail.com

**रजिस्टर पोस्टाने** क्र.सकआ/आस्था-5- (अ) /ससेभप्र/शिक्षक

सहाय्यक शिक्षक (ठोक वेतन) **कागदपत्र पडताळणी** 2017-18/का-6/1123

दिनांक . 05.06.2017 दिनांक 17/05/2017

**प्रति,**

**(दिनांक. 15.05.2017 रोजीच्या निवड यादीमध्ये नावे असणारे उमेदवार)**

**विषय : " सहाय्यक शिक्षक इयत्ता 9 वी व 10 वी (ठोक वेतन)" या पदासाठी प्राथमिक (Provisional) निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्रे तपासणीबाबत.**

**संदर्भ :- 1. दिनांक 21.03.2017 रोजीची कागदपत्र पडताळणी.**
**2. दिनांक 15.05.2017 रोजीची तात्पूरती निवड यादी .**

वरील विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्रं. 1 अन्वये सहाय्यक शिक्षक (ठोक वेतन) इयत्ता 9 वी व 10 वी या पदाची कागदपत्र पडताळणी झाली. सदर कागदपत्र पळताळणीसाठी गैरहजर असलेले उमेदवार व कागदपत्र पडताळणी अंति अपात्र ठरलेल्या उमेदवारां ऐवजी निवड केलेल्या उमेदवारांचा संदर्भ क्रं. 2 च्या निवड यादीतील ज्या उमेदवारांच्या नावांचा समावेश आहे त्या उमेदवारांचे नाव विचाराधीन असून त्यासाठी खालील **मूळ** कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक आहे.

1. शैक्षणिक पात्रतेची सर्व कागदपत्रे (TET गुणपत्रकासह)
2. जातीचा दाखला आवश्यक आहे जात वैधता प्रमाणपत्र असल्यास सादर करावे सदर पदी निवड झाल्यास नियुक्ती झाल्यापासून 6 महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
3. नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (महिलांसाठी राखीव असलेल्या पदांसाठी तसेच विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग इत्यादीसाठी राखीव असलेल्या पदांसाठी 2 प्रतीत)
4. अपंगत्वाचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ( किमान 40%) (अपंग उमेदवारांसाठी 2 प्रतीत)
5. खेळाचे प्रमाणपत्र (खेळाडूंसाठी 2 प्रतीत)
6. माजी सैनिक असल्याबाबतचे /युध्द काळात किंवा युध्द नसतांना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाचे फक्त एक पाल्य असल्याबाबतची आवश्यक कागदपत्र. (2 प्रतीत)
7. अंशकालीन /प्रकल्पग्रस्त /धरणग्रस्त /भुकंपग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र.(2 प्रतीत)
8. इतर आवश्यक कागदपत्रे (ऑनलाईन अर्जाची छायांकित प्रत, स्वताचे ओळखपत्र,पासपोर्ट साईज फोटो इ.) सादर करावेत .
9. सर्व मूळ कागदपत्रांची छायांकीत (सांक्षाकीत केलेली) 1 प्रत स्वतंत्र सादर करावी.
10. सदर कागदपत्र पडताळणीसाठी अनुपस्थित राहील्यास मुदतवाढ दिली जाणार नाही व पुन्हा कागदपत्र पडताळणीसाठी बोलविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

उमेदवारांनी वरील मुळ कागदपत्रे तपासणीसाठी सोबत आणावी तसेच सर्व कागदपत्राच्या स्वस्वाक्षरीत (Self Attested ) प्रतीसह, **दिनांक. 05.06.2017 रोजी सकाळी 10.00 वाजता समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च पथ , जी.पी.ओ. जवळ , पुणे** 1 येथे कागदपत्र पडताळणीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे.

उपआयुक्त (प्रशासन)
समाज कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य,पुणे

C:\Users\YSM\AppData\Local\Temp\उमेदवाराची कागदपत्र पडताळणी पत्र.docx